# घोडबंदर येथील रस्ते दुरूस्तीची उर्वरित कामे ३० मे पर्यत पूर्ण करा-आयुक्त

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-४

अंक - ४३

epaper.diwanews.com

घोडबंदर रोडवरील बहुतांश कामे पूर्ण झाली असली तरी उर्वरित कामे ३० मे पर्यंत यूद्धपातळीवर पुर्ण करण्याचे निर्देश महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व मेट्रो, एमएमआरडीए आदी प्राधिकरणांना दिले....

(पान ८वर)

www.diwanews.com ♦ सोमवार,२६ मे २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

## गटाराचे काम करताना रस्त्याचेच गटार झालय

# सांगा या चिखलातून दिवेकरांनी कसं चालायचं?

हा दिव्यातील सदगुरु नगर मधील नागरी वस्तीतील रस्ता आहे.रस्त्याचे गटार तोडण्यात आले आहे आणि गटारातील चिखल, गाळ हा रस्त्यावर पसरला आहे.हा गाळ आणि चिखल साफ कोणी करायचा ?पालिका प्रशासन ही तसदी घेईल काय ?खरं तर गाळ आणि चिखल तातडीने उचलून हा रस्ता स्वच्छ करायला हवा. पण दिव्यात स्वच्छता ठेवायचीच नाही असा जणू काही निर्धारच पालिका प्रशासनाच्या स्वच्छता विभागाने केलेला दिसतो.



दिव्यात ठाणे पालिकेचे अस्तित्व जाणवत नाही असे आम्ही जे नेहमी म्हणतो ते अशा प्रकारच्या गृहीत धरण्याच्या वृत्तीमुळे.दिवा शहरातील जनतेला अशाच पद्धतीने गृहीत धरण्याची परंपरा या निमित्ताने पालिका प्रशासन आणि कर्मचाऱ्यांनी जपलेली दिसते. संपूर्ण रस्ता चिखलात माखला आहे.काम गटाराचे आहे घाण रस्त्यावर आहे. रस्त्याचेच गटार झाले आहे. नागरिकांना चालण्यासाठी जागा नाही.लहान मुलं, वयोवृद्ध नागरिक यांसह नागरिकांना चालताना होणारा त्रास...याचा विचार करणार कोण? गटार बांधणीचे काम करायचं असेल तर ते नियोजन पद्धतीनं करायला हवं. नागरिकांना चालण्यासाठी जागा सोडायला हवी. रस्त्यावर घाणीचं साम्राज्य पसरलेल आहे.वेळीच नालेसफाई न झाल्याने अशा पद्धतीने शहरात अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये गाळ साचलेला राहतो, हे आम्ही याआधी वारंवार सांगितल आहे. मात्र ढिम्म असणारे पालिका प्रशासन याकडे लक्ष देताना दिसत नाही. दिवा शहरातील अंतर्गत गटारे हे मुख्य नाल्यांना न जोडली गेल्याने त्या गटारांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला आहे.खरं तर पालिका प्रशासनाने एप्रिल मे मध्येच अंतर्गत गटारांची संपूर्ण सफाई करणे अपेक्षित आहे.गटारातील गाळ हा आधुनिक तंत्रज्ञान वापरून मशीनच्या माध्यमातून काढला गेला असता तर तो अशा पद्धतीने रस्त्यावर पसरलेला दिसला नसता. परंतु दिवा शहरात कशाही पद्धतीने काम केलं तर चालतं हेच यातून दिसते. जर हे काम पालिका प्रशासन पावसाळ्याच्या तोंडावर करत असेल तर या घाणीच्या साम्राज्याला जबाबदार कोण ?दुर्गंधी, अस्वच्छता यातून आजार निर्माण झाल्यास याला जबाबदार कोण ?हे प्रश्न यानिमित्ताने निर्माण होतात... शहराचे नियोजन पाहणाऱ्यांना याकडे लक्ष द्यायला हवे.

दिवा न्यूज सडेतोड



# ठाण्यात नालेसफाईच्या कामात ठेकेदारांकडून हलगर्जीपणा; मनसेने दिला आंदोलनाचा इशारा

**ठाणे** :- पावसाळ्याच्या तोंडावरही ठाण्यात नालेसफाईचे काम संथ गतीने सुरू असून अनेक भागांमध्ये नाले कचऱ्याने भरलेले आहेत. ठाणे महानगरपालिका दरवर्षी करोडो रुपयांचे ठेके देऊन नालेसफाई करत असली तरी प्रत्यक्षात या कामात ठेकेदारांकडून मोठ्या प्रमाणावर हलगर्जीपणा होत आहे. यामुळे ठाणेकरांमध्ये संतापाचे वातावरण आहे. नालेसफाई योग्यपद्धतीने न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभाग ठाणे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी निवेदनाव्दारे दिला आहे.

प्रत्येक वर्षी पावसाळ्यापूर्वी ठाणे महापालिकेच्या वतीने प्रभाग समितीनिहाय नालेसफाईची कामे हाती घेतली जातात. यासाठी संबंधित प्रभाग अधिकारी आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून देखरेख केली जाते. तरीही इंदिरा नगर, लोकमान्य नगर, सावरकर नगर, गांधीनगर, शास्त्रीनगर, माजीवाडा, घोडबंदर रोड यांसारख्या भागांतील नाले अजूनही कचऱ्याने भरलेले आहेत. के विला परिसरात पहिल्याच पावसात मुख्य नाला तुंबल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागला. अशाच प्रकारची परिस्थिती शहरातील इतर भागांमध्ये उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. महापालिकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, नालेसफाई करताना पद्धतीचा वापर करून संपूर्ण नाल्याची सफाई करणे बंधनकारक आहे. तसेच सफाईनंतरचा गाळ व कचरा तात्काळ डम्पिंग ग्राउंडवर हलवणे आवश्यक असताना, अनेक ठिकाणी तो नाल्याच्या कडेला किंवा पुन्हा नाल्याच्या आतच ढकलून ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. महापालिका प्रशासन दरवर्षी नालेसफाईसाठी नवीन योजना व तंत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न करत असले, तरी ठेकेदारांकडून ही कामे केवळ कागदावर दाखवली जात असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभाग ठाणे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर केला आहे. सफाईचे प्रत्यक्ष निरीक्षण केल्यावर, कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्न उपस्थित होतात. ठाणेकर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नालेसफाई अत्यंत महत्त्वाची असून महापालिका प्रशासन आणि ठेकेदार यांच्याकडून प्रामाणिक आणि पारदर्शक काम होणे अपेक्षित आहे. अन्यथा, पावसाळ्यात शहर पुन्हा एकदा जलमय होण्याचा धोका आहे.




**ठाणे महानगरपालिकेच्या वतीने नालेसफाईचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात आले नाही तर मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल व या सर्वस्वी ठाणे महानगरपालिका प्रशासन जबाबदार असेल.स्वप्नील महिंद्रकर, ठाणे शहर अध्यक्ष, जनहित व विधी विभाग मनसे.**

# कल्याणमधील इमारतीचा स्लॅब कोसळल्याने जीवितहानी

**एकूण सहा जखमी तर सहा जणांचा मृत्यू; तहसिलदार कार्यालयाकडून अहवाल सादर**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मृतांना श्रद्धांजली तर नातेवाईकांना रु.पाच लाख अर्थसहाय्याची घोषणा**

**ठाणे** :- कल्याण शहरातील कल्याण (पूर्व) चिकणीपाडा येथील सप्तशृंगी कॉपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी या पाच मजली निवासी इमारतीमधील चौथ्या मजल्यावर फरशी बसविण्याचे काम सुरू होते. हे काम सुरू असताना चौथ्या मजल्याचा स्लॅब खाली कोसळला आणि ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एकूण ६ व्यक्ती जखमी झाल्या असून ६ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती तहसिलदार सचिन शेजाळ यांनी दिली आहे.

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, कल्याण यांनी दिलेल्या अहवालानुसार, ही घटना दि. २० मे २०२५ रोजी दुपारी २.०० वाजताच्या सुमारास घडली. ही दुर्घटना घडल्यानंतर जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अशोक शिनगारे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक प्रशासनाने तात्काळ मदत व बचाव कार्य सुरू केले.

त्याचबरोबर घटनेनंतर प्रशासनाकडून तातडीने पंचनामा करण्यात आला असून, जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत.

घटनास्थळावरील शोध कार्य पूर्ण झाले असून इमारतीतील नागरिकांना जवळील ज्ञानमंदिर विद्यालय, कल्याण (पूर्व) येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे त्या सर्वांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या घटनेची माहिती मिळाल्याबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेतील मृत सहा नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असल्याचे सांगितले. तसेच मृतांच्या कुटुंबियांना शासनातर्फे पाच लाखांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणाही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केली आहे.

## ठाण्यात कोरोनाने युवक दगावला ; एकाच दिवशी वाढले ९ रुग्ण

**ठाणे:** ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात शनिवारी सकाळी दगावलेल्या २१ वर्षीय युवकाचा कोरोनामुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्या युवकाला टाईप वन डायबेटीस होता. जो केवळ इन्सुलीनने कंट्रोल होतो. त्याला ज्यावेळी ?डमिट केलं होतं त्यावेळी तो सिरियस होता. अशी माहिती ठामपा प्रशासनाने दिली. तर दुसरीकडे शनिवारी एकाच दिवशी ठाण्यात ०९ रुग्ण सापडल्याने रुग्णांची संख्या १९ वर पोहोचली आहे. त्यामुळे ठाण्यात पुन्हा कोरोनाने धोक्याची घंटी वाजण्यास सुरुवात केल्याचे दिसू लागले आहे.

शुक्रवारी ठाणे महापालिका हद्दीत १० रुग्णांची नोंद झाल्याचे महापालिका प्रशासनाने जाहीर केले होते. मात्र कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारार्थ दाखल असताना, शनिवारी मृत्युमुखी पडलेल्या मुंब्र्यातील २१ वर्षीय युवकाला कोविड-१९ ची लागण झाल्याचे समोर आले. असे कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राकेश बारोट यांनी सांगितले. तसेच त्या रुग्णाला गुरुवारी टाइप वन मधुमेह आणि ॲसिडोसिसच्या गुंतागुंतीमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि संसर्ग वाढत होता. रुग्णाला आयसीयूमध्ये हलवून व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते, असे सांगितले.

१७ गृह विलगीकरणात

आतापर्यंत १९ रुग्ण आढळून आले आहेत. त्यापैकी एक जण दगावला असून त्याला सहव्याधी होत्या. तर एकावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. तसेच १७ रुग्ण गृह विलगीकरणात असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५

**संपादक -सुहास शांताराम खंडागळे** **RNI No.-MAHMAR/2021/80669**

# राष्ट्रीय एकता व जवानांच्या सन्मानार्थ भाजपच्या वतीने दिव्यात तिरंगा पदयात्रा




**दिवा:-** भारतीय जनता पार्टी दिवा शहर यांच्या वतीने राष्ट्रीय एकता व जवानांच्या सन्मानार्थ शुक्रवारी तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. दिवा शहरातील प्रशांत नगर, येथील भाजपचे ठाणे जिल्हा कार्यकारणी सदस्य गणेश भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाजवळून या तिरंगा पद यात्रेला सुरूवात करण्यात आली.

राष्ट्रीय एकतेचे दर्शन घडवण्यासाठी व सीमेवरील सैनिकाचे मनोबल वाढवण्यासाठी सदर तिरंगा पदयात्रेचे दिवा भाजपच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. सदर तिरंगा यात्रा मुंब्रादेवी कॉलनी रोड,विठ्ठल रुक्मिणी मंदिर या मार्गाने काढण्यात आली. दिवा पोलीस चौकी येथे या पदयात्रेचा समारोप झाला.

भाजपचे दिवा मंडळ अध्यक्ष सचिन रमेश भोईर,

ठाणे जिल्हा कार्यकारणी सदस्य अशोक पाटील ,गणेश भगत , विजय भोईर ,विनोद भगत, रोशन भगत , जिलाजीत तिवारी , माजी मंडळ अध्यक्ष दिलीप भोईर , ठाणे जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस सतीश केळशीकर

दिवा मंडळ सरचिटणीस समीर चव्हाण , अंकुश मढवी, प्रवीण पाटील, मधुकर पाटील ,महिला मोर्चा अध्यक्ष सपना भगत , सीमा भगत , उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष अजय सिंग , अशोक गुप्ता , ओबीसी मोर्चा अध्यक्ष श्रीधर पाटील, व्यापारी मोर्चा अध्यक्ष जयदीप भोईर , सुदेश पाटील , यज्ञेश पवार, रामदास सुगर, दुर्गेश मढवी, प्रणव भोईर ,आकाश भोईर , राहुल शाहू , विठ्ठल गावडे ,ज्येष्ठ नागरिक अमरनाथ गुप्ता , संजय सिंह , अवधराज राजभर ,समशेर यादव ,वीरेंद्र गुप्ता , अनिल सिंग , किरण कोरगावकर , रवी मुनंकर , क्रांतिसिंह, अमरसिंग , कल्पेश सारस्वत , मंगल राणे ,पुनम सिंग , रीना सिंग , नीलम मिश्रा , वर्षा काळे , साधना सिंग ,रेणू पांडा , मनीषा शालबिंद्रे, दिव्या शेलार रुक्मिणी जोंधळे ,जानवी मांडवलकर नम्रता गोसावी ,गायत्री शिंदे, रेणूबेन पढाया आदी कार्यकर्ते व पदाधिकारी,तसेच दिवेकर नागरिकांनी या तिरंगा पदयात्रेत आपला सहभाग नोंदवला.







## पेसा क्षेत्रात अतिरिक्त घर भाड्याची प्रतीक्षा ; शिक्षक समितीची प्रधान सचिवांकडे मागणी

**ठाणे:-** महाराष्ट्र शासनाने नक्षलग्रस्त भागात कार्यरत जिल्हा परिषद शिक्षक व इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन पर अतिरिक्त घरभाडे भत्ता (चटई क्षेत्र)मंजूर केला आहे. नक्षलग्रस्त भागासोबत आदिवासी उपयोजना क्षेत्र (पेसा) भागात ही हा भत्ता देय असल्याने ठाणे जिल्ह्यातील शहापूर, भिवंडी, मुरबाड तालुक्यातील पेसा क्षेत्रात कार्यरत जिल्हा परिषद शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त घरभाडे भत्ता लागू करण्याची मागणी प्राथमिक शिक्षक समिती ठाणे जिल्हा शाखेने शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवाकडे निवेदनाद्वारे केली आहे.आदिवासी नक्षलग्रस्त भागातील शासकीय कर्मचाऱ्यांना या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंत ६ ऑगस्ट २००२ च्या शासन निर्णयानुसार अतिरिक्त घर भाडे भत्ता (चटई क्षेत्र)मंजूर करण्यात आला आहे परंतु प्राथमिक शिक्षण संचालक, पुणे यांनी केवळ नक्षलग्रस्त भागातील जिल्हा परिषद शिक्षकांसाठी शालार्थ प्रणालीमध्ये टॅब उपलब्ध करून भत्ता देय करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यातील अनेक आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आश्रम शाळा,तहसील व शासनाच्या इतर कार्यालयातील कर्मचारी अतिरिक्त घर भाडे भत्याचा लाभ घेत आहेत.शिक्षक या लाभापासून वंचित असल्याने ठाणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जिल्हा परिषद शिक्षकांना शालार्थ प्रणालीमध्ये अतिरिक्त घर भाडे भत्याचा टॅब उपलब्ध करून देण्याचे शिक्षण संचालक प्राथमिक यांना निर्देश देण्याची मागणी या निवेदनात केली आहे. मागणी मंजूर झाल्यास ठाणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ३५९ गावात कार्यरत जवळपास १७०० जिल्हापरिषद शिक्षक तसेच शासनाच्या इतर कार्यालयात कार्यरत शेकडो कर्मचाऱ्यांना याचा लाभ होऊ शकतो. आदिवासी उपयोजन क्षेत्रात कार्यरत शिक्षक व कर्मचाऱ्यांना शासन निर्णयान्वये अतिरिक्त घर भाडे भत्ता देय असताना ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षक व कर्मचारी गेली अनेक वर्षा पासून वंचित आहेत.

*प्राथमिक शिक्षक समितीचे याबाबत मंत्रालय स्तरावर प्रयत्न सुरू असून लवकरच याबाबत सकारात्मक निर्णय होईल. - विनोद लुटे ,जिल्हाध्यक्ष , प्राथमिक शिक्षक समिती ठाणे.*

## डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी केली राबोडी परिसरातील नाल्यांची पाहणी

# भ्रष्टाचारामुळे ठाणेकरांचा पैसा कळवा खाडीत वहात जातोय- डॉ.जितेंद्र आव्हाड

**ठाणे** - राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधीमंडळ गटनेते डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी आज (दि. २४) राबोडी परिसरातील नाल्यांची पाहणी केली. या पाहणी दरम्यान पुलाच्या बांधकामांचा राळारोडा नाल्यात टाकल्यामुळे खाडी आणि नाल्यामधील सामाईक ओढा बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे आढळून आले. दरम्यान, ठाणे महानगर पालिका अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या भ्रष्टाचारामुळेच नालेसफाईचे तीन तेरा वाजले असून ठाणेकरांचा कराचा पैसा कळव्याच्या खाडीत वाहून जात आहे, अशी टीका डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी केली. नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे राबोडीच्या क्रांतीनगर भागातील नागरिकांच्या घरात पाणी साचले होते. त्यामुळे अनेकांचे संसार पाण्यात वाहून गेले आहेत. नाल्यावर बांधला जात असलेला पूल आणि त्याचा राळारोडा नाल्यात टाकल्याने ही पूरस्थिती निर्माण झाल्याने त्याची पाहणी करण्यासाठी डॉ.जितेंद्र हे शहराध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील यांच्यासह राबोडी परिसरात गेले होते.

या नाल्याची आणि त्यावर बांधण्यात येत असलेल्या पुलाचे बांधकाम पाहून डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, विद्युत रोषणाईचा ठेका ज्या एसएमसी कंपनीला देण्यात आला होता. त्याच कंपनीला ह्या बांधकामाचेही कंत्राट देण्यात आले आहे. नाल्यावरील स्लॅबचे बांधकाम करताना वापरण्यात येणाऱ्या सळईंवर रासायनिक प्रक्रिया करायची असते. मात्र, ती न केल्याने आताच सळयांना गंज लागला आहे. भविष्यात होणाऱ्या आपत्तीची जबाबदारी कोण घेणार आहे का? त्यामुळेच ज्या नागरिकांच्या घरात पाणी गेले होते त्यांना ठामपाने भरपाई द्यावी. तसेच, नाल्यामुळे विस्थापित झाल्याचे दाखवून बीएसयूपीमध्ये कोणाला घरे दिली गेली, याचाही हिशोब जाहीर करावा, अशी मागणी केली.

याप्रसंगी राजेश खारकर, राजेश कदम, राजेश साटम, अंकुश मढवी, संजीव दत्ता, रचना वैद्य, शिवा यादव, दिगंबर गरुड, एकनाथ जाधव, संदीप यादव , सुरेश सिंह, मयूर पाटील , मयुर पगारे, गणेश मोरे, संदीप क्षीरसागर , जयेश पाटील, बंटी मोरे, राहुल पाटील, प्रशांत मोरे यांच्यासह शेकडो स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# हिरानंदानी इस्टेट परिसरातील कावेसर तलाव येथील उद्यानाच्या कामाचे भूमिपूजन

**ठाणे** :- लोकसभा निवडणुकीत हिरानंदानी इस्टेट परिसरातील कावेसर तलाव येथील उद्यानाचे सुशोभीकरण करण्याचे वचन खासदार नरेश म्हस्के यांनी दिले होते. या आश्वासनाची पूर्तता खासदार नरेश म्हस्के यांनी केली असून आज रविवार, दि. २५ मे रोजी सकाळी ९ वाजता या कामाचे भूमिपूजन संपन्न झाले. रीप रीप पावसातही हिरानंदानी इस्टेट परिसरातील रहिवासी, जेष्ठ नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी माजी महापौर सौ. मीनाक्षी शिंदे, माजी नगरसेविका अर्चना मणेरा, माजी नगरसेविका कविता पाटील, माजी नगरसेविका कमल चौधरी, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, शिवसेना शाखाप्रमुख प्रवीण नागरे, पातलीपाडा शाखाप्रमुख संजय मोरे, हिरानंदानी रेसिडेंशिअल असोसिएशनचे चेअरमन अध्यक्ष मधु मेनन, जेष्ठ नागरिक, महिला आणि मान्यवर उपस्थित होते.

शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे शासन स्तरावर पाठपुरावा करून खासदार नरेश म्हस्के यांनी निधीची उपलब्धता केल्याने कावेसर तलाव येथील उद्यानाचे सुशोभीकरण करण्यात येत आहे.

५.६ एकर जागेवर असलेल्या या उद्यानातील हिरवळीला कोणतीही बाधा न आणता केवळ १० टक्के भागाचा विकास करण्यात येणार आहे. रहिवासी सध्या खडकाळ तर पावसाळ्यात चिखल तुडवत चालत असलेल्या पायवाटेवर पदपथांची निमिर्ती करण्यात येणार आहे. या पदपथामुळे वयस्कर नागरिकांना चालणे सुलभ होणार आहे. योग साधना तसेच झुंबा व इतर गायन, गायन वादनाच्या हौशी कलाकारांसाठी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ओपन जिम सुरु करण्यात येणार आहे.

या उद्यानात भरपूर हिरवाई असल्याने फुलपाखरू गार्डनाची निर्मिती केली जाणार आहे. तलाव आणि उद्यान याच्या मध्ये स्काय वॉच टॉवर उभारला जाणार आहे, जेणे करून रहिवाशांना एकाच वेळी हिरवळ आणि तलावाचे निरीक्षण करता येईल. तलाव किनारी रुफकव्हर उभारले जातील. या मध्ये बसून उन्हाळा असो व पावसाळा रहिवाशांना निसर्गाचा आनंद घेता येणार आहे. काही ठिकाणी छोटे अत्याधुनिक साकव बांधण्यात येणार आहेत. या पुलांवरून चालताना ?क्युप्रेशरचा अनुभव घेता येणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली.

ठाणे शहराच्या विकासासाठी नेहमीच भरीव निधी देणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष आभार मानत कावेसर तलाव येथील उद्यानाचे सुशोभीकरण होण्यासाठी पाठपुरावा करणारे शिवसेना शाखाप्रमुख प्रवीण नागरे तसेच माजी नगरसेविका अर्चना मणेरा, माजी नगरसेविका कविता पाटील, माजी नगरसेविका कमल चौधरी यांचेही यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी आभार मानले.




## दुर्लक्षित उद्यानाचा सुशोभिकरणातून होणार कायापालट

हिरानंदानी इस्टेट सीनियर सिटीझन्स फाउंडेशन अध्यक्ष श. डी. पी. त्रिपाठी, रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी इव्हान अध्यक्ष चेतना सिंग, रवीश दोबानी, रोडस लाफ्टर क्लब श्री कुलकर्णी, किरण ठाकूर, रोडास सीनियर सिटीझन ग्रुपचे पदाधिकारी व्ही. जी. राव, श्री सी एन शेट्टी, किम्स हॉस्पिटल क्षेत्रीय प्रमुख सौरभ गुप्ता, रोडस वरिष्ठ नागरिक अध्यक्षा श्रीमती कमलताई फुटाणे यावेळी उपस्थित होते. समाजमाध्यमामधून उद्यानाच्या उभारणीबाबत काही गैरसमज पसरविण्यात आले होते, त्याचे यावेळी मोठ्या स्क्रीन वर प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण करून निराकरण करण्यात आले. तसेच खासदार नरेश म्हस्के यांनीही रहिवाशांशी संवाद साधत प्रकल्पाचे काम समजावून सांगितले. गैरसमजाचे निराकरण झाल्याने उपस्थित सर्व रहिवाशांनी उद्यान सुशिभिकरणाचे स्वागत केले. खासदार नरेश म्हस्के यांना संसदरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आणि वचनपूर्ती केल्याबद्दल त्यांचा रहिवाशांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# ३१ मे ची डेडलाईनला काही दिवस बाकी; कामे अजुन अर्धवट

## यंदाच्या पावसाळ्यात ठाणे तुंबले तर याला प्रशासन जबाबदार - राजन विचारे

ठाणे : ३१ मे ची डेडलाईनला काही दिवस बाकी असून कामे अजुन अर्धवट दिसत आहेत. त्यातच अर्धे ठाणे खोदून ठेवले असून तलावांची झालेली दुरावस्था, कचऱ्याच्या समस्या, नालेसफाई समस्या, घोडबंदर पट्ट्यात अपूर्ण असलेल्या कामांमुळे यंदाच्या पावसाळ्यात ठाणे तुंबले तर याला प्रशासन जबाबदार असल्याचे टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, माजी खासदार राजन विचार यांनी केला आहे. ठाणे महापालिकेच्या सूरू आसलेल्या बेबंद कारभारावर राजन विचारे ठाणे महापालिका आयुक्तांवर चांगलेच घसरले.

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात शिवसेना नेते राजन विचारे यांनी आयोजित केलेली बैठक काल रात्री उशिरापर्यंत सुरू होती. सदर बैठकीत तलावांचे शहर ओळखल्या जाणाऱ्या ठाणे शहरांतील तलावांची झालेली दुरावस्थेसह शहरातील अपूर्ण असलेल्या कामांची पोलखोल करण्यात आली.

एखादा लोकप्रतिनिधी वारंवार पत्र देऊन जर त्या पत्रांची कोणाच्या सांगण्यावरून दाखल घेत नसतील तर सर्व सामान्यांनी न्याय कोणाकडे मागायचा असा सवाल विचारे यांनी उपस्थित केला. सध्या महापालिकेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासन कारभार संभाळत आहे. आपल्याला वाटेल तसे काम अधिकारी करत आहेत. तसेच सत्तेत असणऱ्या शिंदे गटाच्या मनमानी कारभारामुळे प्रशासनावर कोणाचे अंकुश राहिले नाही.

गेल्या सहा महिन्यापासून ऐतिहासिक अशा सिद्धेश्वर तलावाची झालेल्या दुरवस्थेबाबत वारंवार पत्र देऊन गाळ काढण्याची मागणी करत होते. याचा नियोजित आराखडा ही मंजूर करून निधी अभावी काम थांबवून याकडे गांभीर्याने दुर्लक्ष करून आवडत्या ठेकेदारांची बिले काढण्यात अधिकारी व्यस्त आहेत. या त्यांच्या निष्काळजीपणामुळे तलावातील वारंवार मासे मरत आहे . सिद्धेश्वर तलाव , ब्रम्हाळा तलाव, मदार्ड तलाव मासे मरायला अधिकारी जबाबदार आहेत. पावसाळा लक्षात घेऊन गाळ न काढल्याने जर या तलावातील पाणी शेजारील झोपडपट्ट्यांच्या घरात घुसले तर याला त्या अधिकाऱ्याला धरून त्यावर गुन्हे दाखल करा अशी मागणी विचारे यांनी पत्राद्वारे केली आहे

**नालेसफाई ही हात की सफाई**



पावसाला तोंडावर आला असताना शहरातील नालेसफाई ४५६ झाली असल्याचा दावा प्रशासनाने केला. उर्वरित ५५नालेसफाई कधी पूर्ण करणार असा सवाल विचारे यांनी केला. साफसफाई करणऱ्या ठेकेदार वरवरचा कचरा उचलून गाळ तसाच खाली ठेवतात. मोठा पाऊस आला की सर्व कचरा पावसाच्या वेगाने पुढे ढकलला जातो याची वाट पाहत असतात त्यामुळे त्यांचे काम हलके होते हे अधिकाऱ्यांना दिसत नाही का?

यंदा घोडबंदर पाण्याखाली जाणार

घोडबंदर पट्ट्यात अनेक ठिकाणी एमएमआरडीए अंतर्गत रस्त्यांची कामे सुरू आहेत. यांची मुदत ३१ मे पर्यंत पुर्ण होतील असे आयुक्तांनी सांगितले. कामे पूर्ण करण्याची जबाबदारी सर्व यंत्रणेची आहे. घोडबंदर रोडवरील सर्व्हिस रोड खोदून ठेवले आहेत. त्याची कामे बाकी आहेत. यंदा घोडबंदर पाण्याखाली जाणार अशी भीती विचारे यांनी व्यक्त केली. पाणी तुंबले तर त्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा अशी मागणी ही पत्राद्वारे केली आहे

# ठाणे महापालिका क्षेत्रात कोरोनाचे १० रुग्ण

### घरीच उपचार सुरू, गंभीर लक्षणे नाहीत

### छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात विशेष कक्ष तयार

### सर्तक राहण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या तीन दिवसात कोरोनाचे १० रुग्ण आढळले असून त्यांच्यात कोरोनाची सौम्य लक्षणे असून त्यांच्यावर घरीच उपचार सुरू आहेत. दरम्यान, कोरोना रुग्णांच्या तपासणीसाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने तसेच सर्व रुग्णालयांनी सतर्क रहावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. तसेच, कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात विशेष कक्ष तयार करण्यात आला आहे.

कोरोना रुग्ण आढळण्यास सुरूवात झाल्याच्या पार्श्वभूमीवर, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत महापालिका क्षेत्रातील कोरोना रुग्ण स्थितीची माहिती घेतली. शुक्रवारपर्यंत महापालिका क्षेत्रात कोरोनाचे १० रुग्ण आढळले आहेत. त्यांच्यात कोरोनाची सौम्य लक्षणे आढळली असून त्या सर्व रुग्णांवर घरीच उपचार करण्यात येत आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी चेतना नितील यांनी या बैठकीत दिली. त्याचबरोबर, सर्व आरोग्य केंद्रात पुरेसा औषध साठा उपलब्ध असून तेथे टेस्टिंग कीटही आहेत, असेही त्यांनी सांगितले.

तसेच, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे कोरोनाच्या रुग्णांसाठी १९ खाटांचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आल्याची माहिती रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. अनिरुद्ध माळगावकर यांनी दिली. आरटीपीसीआरची सुविधाही कळवा येथे उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

# तलावांचे शहर नाव बदलून कचऱ्यांचे आणि डबक्यांचे शहर करा

**ठाणे** :- तलावांचे शहर नाव बदलून कचऱ्याचे आणि डबक्यांचे शहर असं नामकरण करा असा टोला शिवसेना (उबाठा )पक्षाचे नेते, माजी खासदार राजन विचारे यांनी पालिका अधिकाऱ्यांना लगावला. ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या समवेत राजन विचारे यांनी आज पहिला टप्प्यातील ठाणे शहराचा दौरा केला. यावेळी नाल्याचा,रस्त्याची आणि तलावांची दुरावस्था पाहून विचारे यांनी पालिका अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. पावसाळ्यापूर्वी झालेली नालेसफाई व तलावांची झालेले दुरावस्थेबाबत पोलखोल केली. त्यानंतर ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या बरोबर संयुक्त दौरा केला. या दौऱ्याची सुरुवात मासुंदा तलाव येथून करण्यात आली. यामध्ये तलावाच्या आउटलेटची कामे निधी अभावी अपूर्ण स्थितीत असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे पावसाचे पाणी बाजारपेठ मध्ये जाऊन दरवर्षी व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याची भीती व्यक्त केली. तसेच वंदना डेपो येथील पारस सोसायटी समोरील नाला कचऱ्यानी तुंडूब भरलेला दाखवत ठेकेदार कशी हात की सफाई करतो याचं उदाहरण त्या ठिकाणी अधिकाऱ्यांच्या दाखवून दिले. या पाहणी दौऱ्यात ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, प्रदूषण नियंत्रण अधिकारी मनीषा प्रधान , उपनगर अभियंता सुधीर गायकवाड,कार्यकारी अभियंता मोहन कलाल ,भगवान शिंदे, वैभव तपकिरी ,चंद्रकांत सावंत, स्वच्छता निरीक्षक अधिकारी व इतर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कचराळी तलाव येथे इरिगेशन पंप बंद अवस्थेत पडलेले आहेत व कसे गवत तयार होत आहे याचं स्पष्ट उदाहरण त्यांनी दाखवून दिले त्यावेळी शिवसेना नेते राजन विचारे हे अधिकाऱ्यांवर चांगलेच घसरले ठाणे हे शहर लेक सिटी नसून डबक्यांचे सिटी म्हणून बोर्ड लावा असे अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले सिद्धेश्वर तलाव परिसरातील रूपादेवी पाडा येथील नाल्यातील साठलेला कचरा निदर्शनास आणून देऊन ऐतिहासिक अशा सिद्धेश्वर तलावाची पाहणी केली.` लोकप्रतिनिधी नसल्यामुळे अधिकारांचे प्रशासनावरील अंकुश सुटल्यामुळे आपल्या मनाप्रमाणे कामे करीत आहेत . त्यावेळी अधिकाऱ्यांना ही कामे वेळेत पूर्ण करा नाहीतर आंदोलन उभे करावे लागेल असा थेट इशारा दिला आहे.



संयुक्त दौऱ्यात राजन विचारे यांनी पालिका अधिकाऱ्यांना धारेवर धरले

# ठाण्यात काँग्रेसची याद करो कुर्बानी, तिरंगा पदयात्रा संपन्न

**ठाणे :-** भारतीय सैन्यदलाला मानवंदना देऊन सर्व भारतीय सदैव त्यांच्या सोबत आहेत आणि त्यांच्या अतुलनीय पराक्रमाची गाथा जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी स्व.राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त ठाणे काँग्रेस च्या माध्यमातून ठजरा याद करो कुर्बानीठ तिरंगा पदयात्रा, ठाणे शहर (जि.)काँग्रेस अध्यक्ष ?ड.विक्रांत चव्हाण,प्रदेश प्रभारी संतोष केणे यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात आली.यावेळी स्व.राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त प्रतिमेस तसेच तलावपाळी येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला व उपस्थितांनी अभिवादन करून पदयात्रेला सुरवात करण्यात आली.

सदर प्रसंगी भारतीय तिरंगा ध्वज हातात घेऊन जय जवान जय किसान,भारत माता की जय,वंदे मातरम् अशा घोषणा व देशभक्तीपर गीतांनी वातावरण दुमदुमून गेले होते.सदर पदयात्रेचे ठाणे स्टेशन येथील थोर संविधानकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.यावेळी उपस्थितांना विक्रांत चव्हाण यांनी संबोधीत केले.या वेळी त्यांनी बोलताना सांगितले की, भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू, लालबहादुर शास्त्री,श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या काळात पाकिस्तान बरोबर झालेल्या विजयी युद्धाच्या घटनांचा परामर्श घेतला. व भारताने पाकिस्तानला कसे पराभूत केले याची माहिती दिली.पहेलगामच्या दुर्दैवी घटनेत नाहक बळी गेलेले पर्यटक, व ऑपरेशन सिन्दुर च्या माध्यमातून शहीद झालेले सैनिक यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहीली.या वेळी स्व राजीवजी गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राजीवजी गांधी यांच्या राजकीय कर्तृत्वाबद्दलच्या स्मृती जागृत केल्या.भारत देशाप्रतीच्या घोषणा देऊन, तिरंगा पदयात्रेची समाप्ती करण्यात आली.

भारतीय सैन्य दलाच्या सन्मानार्थ काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीत ठाणे काँग्रेस चे ज्येष्ठ नेते, प्रवक्ते राहुल पिंगळे,यांच्यासह सर्व स्तरातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

# पालघरला नवे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई : -** आदिवासी बहुल जिल्हा असलेल्या पालघरला नवे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर झाले असून आता पालघर जिल्ह्याला ६० हि नवीन परिवहन ओळख मिळाली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री श्री प्रताप सरनाईक यांनी दिली.ते पुढे म्हणाले की, ९ एप्रिल रोजी संपर्कमंत्री या नात्याने पालघर येथे झालेल्या लोकदरबारामध्ये लवकरच पालघर मधील नागरिकांसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्यात येईल असे आश्वासन मी दिले होते .त्याची पूर्तता या निमित्ताने होत असून पालघर जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला यापुढे परिवहन विषयक कामासाठी वसई -विरार ला जाण्याची आता आवश्यकता भासणार नाही. सहाजिकच त्यांच्या वेळ,श्रम आणि पैशाची बचत होणार आहे.

पालघरला ठ उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ठ मंजूर करण्यासाठी तातडीने कार्यवाही केल्या बद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष आभार मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केले आहेत. या संदर्भातील शासन निर्णय लवकरच प्रसिद्ध होईल अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

# ठाणे महापालिका क्षेत्रात ५१ टक्के नालेसफाई पूर्ण

**यांत्रिक पद्धतीने होणारी मोठ्या नाल्यांची सफाई ९० टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण**
**पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे पूर्ण करण्याचा घनकचरा व्यवस्थापन विभागाचा निर्धार**
**वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली नालेसफाईच्या कामाची पाहणी**



**ठाणे:-**ठाणे महापालिका क्षेत्रातील नालेसफाईचे काम ५१ टक्के पूर्ण झाले असून पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची सफाई पूर्ण करण्याचा निर्धार घनकचरा व्यवस्थापन विभागाने केला आहे. यांत्रिक पद्धतीने होणारी मोठ्या नाल्यांची सफाई ९० टक्क्यांपेक्षा जास्त झाली आहे. आता प्रामुख्याने मोठी यंत्रे जाऊ शकत नाहीत अशा छोटे नाल्यांचा सफाईचे काम सुरू करण्यात आले आहे.ठाणे महापालिका क्षेत्रातील नऊ प्रभाग समिती क्षेत्रात छोटे आणि मोठे असे सुमारे २७८ किलोमीटर लांबीचे नाले आहेत. त्यातील मोठ्या नाल्यांची यांत्रिक पद्धतीने बहुतांश सफाई झालेली आहे. दाट लोकवस्ती असलेल्या भागात जेथे छोटे नाले आहेत तेथे मोठी यंत्रे जाऊ शकत नाहीत. तेथे आता नालेसफाईचे काम सुरू झाले आहे.नालेसफाईच्या कामांची पाहणी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्यासह सर्व परिमंडळ उपायुक्त आणि वरिष्ठ अधिकारी करीत आहेत. नाल्यांतून काढलेला गाळ शक्य तितक्या लवकर हलविण्यात यावा, असे निर्देश या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिले आहेत. नियोजित वेळेत नालेसफाईची कामे पूर्ण होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, नालेसफाईबाबतच्या तक्रारींची नोंद घेण्यासाठी प्रभाग समितीनिहाय संपर्क यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. तेथे येणाऱ्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्याची सूचना संबंधितांना देण्यात आल्याची माहिती उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) मनीष जोशी यांनी दिली.

# वेळुक कातकरी वाडी, तालुका शहापूर येथे बालविवाह रोखण्यात प्रशासनाचे यश

**ठाणे:-** शहापूर तालुक्यातील वेळुक कातकरी वाडी येथे नियोजित असलेला बालविवाह मंगळवारी २० मे रोजी प्रशासनाच्या सतर्कतेमुळे यशस्वीरित्या रोखण्यात आला.

या कारवाई दरम्यान बालविकास प्रकल्प अधिकारी धनश्री साळुंखे, पोलीस निरीक्षक सुरेश गावित (कसारा पोलीस ठाणे), पोलीस उपनिरीक्षक सागर जाधव, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाच्या प्रतिनिधी दिपाली कांबळे, सेवा सामाजिक संस्थेचे सुरेखा विशे, पर्यवेक्षिका कसारा-१, तसेच मुख्य सेविका कविता जगताप (बीट - कसारा १, प्रकल्प - डोळखांब) यांनी संयुक्तरीत्या तात्काळ कारवाई करत बालविवाह थांबवला. विशेषतः मुख्य सेविका कविता जगताप यांनी प्रकरणाची माहिती मिळताच तत्परतेने प्रयत्न करून मोठ्या मेहनतीने हा बालविवाह थांबवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

जिल्ह्यातील बालविवाह रोखण्याच्या कार्यवाहीबाबतची आकडेवारी
वर्ष २०२४: १८ बालविवाह प्रकरणे रोखण्यात आली
वर्ष २०२५ (आजअखेर): ६ प्रकरणे यशस्वीरित्या रोखण्यात आली.

ही आकडेवारी लक्षात घेता जिल्ह्यातील जनजागृती उपक्रम आणि प्रशासनाची तात्काळ कृती यामुळे बालविवाह प्रकरणांमध्ये लक्षणीय घट झाली आहे.

या यशस्वी हस्तक्षेपाबाबत जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी संपूर्ण पथकाचे व विशेषतः कर्मचारी व संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक करताना म्हटले की, ठबालविवाहासारख्या सामाजिक संकटांवर प्रभावीपणे कारवाई करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. वेळेवर कृती करून एका बालिकेचे भविष्य वाचवणाऱ्या संपूर्ण पथकाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

बालविकास विभाग, पोलीस प्रशासन, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय व स्वयंसेवी संस्थांनी दाखवलेली एकात्मता आणि सजगता ही समाजासाठी प्रेरणादायी बाब आहे. जिल्हा परिषद, ठाणे मार्फत सहकार्य व जनजागृतीचे उपक्रम पुढेही राबविण्यात येणार असून ग्रामस्थांनी देखील सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# शिवाईनगर भागातील रहिवाशांना दिलासा - वाढीव पाणी बिलास स्थगिती ; पाण्याच्या थकबाकीबाबत लवकरच निर्णय

## माजी नगरसेविका परिषा सरनाईक

**मुंबई:** - शिवाईनगर परिसरात राहण्या नागरिकांना दिलेल्या दंडात्मक पाणी पट्टीच्या नोटीशीला स्थगिती देण्यात आली असून पाणीपट्टीच्या बिलावरील दंड पुर्णतः माफ केला आहे. अशी माहिती ठाणे महापालिकेच्या माजी नगरसेविका परिषा प्रताप सरनाईक यांनी दिली. त्या परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जैस्वाल यांच्याशी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने बोलत होत्या.


त्यापुढे म्हणाल्या शिवाई नगर परिसरातील गिरीराज सोसायटी गीतांजली सोसायटी, शिवशक्ती सोसायटी, चिन्मय सोसायटी, प्रगती सोसायटी ,ओम साई श्रद्धा सोसायटी, या म्हाडाच्या सोसायटी बरोबर श्री समर्थ सोसायटी, सहजीवन सोसायटी, , सुनीती सोसायटी ,एकरूप सोसायटी, सोसायटी, नवदुर्गा सोसायटी, गुरुकृपा सोसायटी, या सोसायटीतील नागरिकांना म्हाडाच्या तथाकथित अधिकाऱ्यांनी वेटीस धरले असून २०-२२ वर्षांनंतर अचानक दंडात्मक रकमेसह थकीत पाणीपट्टीची नोटीस पाठवणे हे अत्यंत चुकीचे आहे. असे तुघलकी आदेश देण्या अधिकाऱ्यांची चौकशी झाली पाहिजे! अशी आग्रही मागणी त्यांनी जैस्वाल यांच्याकडे केली.

यावर बोलताना म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी दंडात्मक पाणीपट्टीच्या नोटीस ला स्थगिती दिली असून पाणीपट्टी वरील दंडात्मक रक्कम पूर्ण माफ करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याबरोबरच या सोसायटी धारकांना मुंबई महापालिकेच्या पाईपलाईन द्वारे अथवा ठाणे महापालिकेचे पर्यंत द्वारे पाणीपुरवठा होतो यासंदर्भात सविस्तर अहवाल देण्याची निर्देश ठाणे महापालिका आयुक्त यांना दिले आहेत. तसेच मुंबई महापालिकेच्या पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा होण्या सोसायटी धारकांचे मूळ बिल देखील फेर तपासणी करून टप्पाटप्प्याने भरण्याची सोय दिले जाईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. याबरोबरच तांत्रिकदृष्ट्या ज्यांच्याकडे केवळ पाणी जोडणी आहे परंतु पाणी येत नाही अशा नागरिकांना दिलेले बिल पूर्ण माफ करण्याचे देखील आश्वासन यावेळी देण्यात आले.

या संदर्भात ठाणे शहरातील शिवाईनगर परिसरातील राहण्या नागरिकांना महापालिका व म्हाडाकडून दुहेरी पाणीबिलांची थकबाकी भरावी लागत असून त्यातून त्यांना मोठा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकरणी तातडीने लक्ष घालावे असे पत्र परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्या अनुषंगाने ठाणे महापालिकेच्या माजी नगरसेविका परीक्षा सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली ठाण्यातील नगरसेवकांचे शिष्टमंडळाने म्हाडाचे व्यवस्थापकीय संचालक संजीव जैस्वाल यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर केले. निवेदन स्वीकारून सकारात्मक तोडगा काढल्याबद्दल माजी नगरसेविका परिषा सरनाईक यांनी म्हाडाचे व्यवस्थापकीय संचालक संजीव जयस्वाल यांचे आभार मानले आहेत. तसेच या संदर्भातील प्रश्न भविष्यात न सुटल्यास आपला लढा यापुढे देखील चालू राहील असे निः संदिग्ध आश्वासन संबंधित सोसायटीच्या रहिवाशांना दिली आहे. या वेळी त्यांच्या सोबत माजी नगरसेविका विमल भोईर, ज्येष्ठ शिवसैनिक संजय कदम व शिवाई नगर मधील असंख्य रहिवासी उपस्थित होते.

# ठाण्यात विंडो एसीला आग

ठाणे: शुक्रवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास नितीन कंपनी परिसरातील हायवे आशीर्वाद या इमारतीच्या रूम नंबर २ मध्ये लावलेल्या विंडो एसीला आग लागली. या आगीच्या घटनेमध्ये एसीसह गादी व बेडचा काही भाग जळून नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. तसेच आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न केल्यावर आग अर्ध्या तासांनी पूर्णपणे नियंत्रणात आली.



सदर आग ही विमलदास यांच्या मालकीच्या घरातील एसीला लागली असून सुदैवाने त्या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. यावेळी ०१ फायर आणि ०१ रेस्क्यू वाहन पाचारण करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.



# घोडबंदर येथील रस्ते दुरूस्तीची उर्वरित कामे ३० मे पर्यत पूर्ण करावीत, महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रात विविध प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या रस्ते दुरुस्तीच्या कामाची पाहणी आयुक्त सौरभ राव यांनी २४ एप्रिलला करून सर्व कामे २० मे पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार संपूर्ण घोडबंदर रस्त्याची पाहणी गुरूवारी (२२ मे) आयुक्तांनी पाहणी केली. घोडबंदर रोडवरील बहुतांश कामे पूर्ण झाली असली तरी उर्वरित कामे ३० मे पर्यंत युद्धपातळीवर पुर्ण करण्याचे निर्देश महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व मेट्रो, एमएमआरडीए आदी प्राधिकरणांना दिले. तसेच पावसाळ्यानंतर करण्यात येण्य्रा कामांच्या ठिकाणी सुचना देणारे फलक लावून वाहतूक सुरळीत सुरू राहील या दृष्टीने नियोजन करण्याबाबतही सूचित केले.

पूर्व द्रुतगती महामार्ग, कापूरबावडी जंक्शन, घोडबंदर रोड, सेवा रस्ता आणि गायमुख घाट या परिसरात सुरू असलेल्या व पुर्ण झालेल्या कामांची आज आयुक्त सौरभ राव यांनी पाहणी केली. यावेळी नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, वाहतूक विभाग, मेट्रोचे अधिक्षक अभियंता अभिजीत दिसीकर यांच्यासह महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीएचे अधिकारी, मेट्रो, विद्युत महावितरण आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



पावसाळ्यात घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहील या दृष्टिकोनातून या रस्त्याची सतत पाहणी करत असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. संपूर्ण घोडबंदर रस्ता, गायमुख पर्यंत सुरू असलेली कामे पुर्ण होत आली आहेत, शेवटच्या टप्प्यातील कामे ३० मे पर्यंत युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे पूर्ण करण्याचे निर्देश सर्व यंत्रणांना दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

**ड्रेनेज, कलव्हर्टच्या साफसफाईचे काम सुरू**

पावसाळ्यात घोडबंदर रोडवरील पाणी साचणार नाही यासाठी सर्व ड्रेनेज लाईन व कलव्हर्ट साफसफाई सुरू आहे. तसेच जुन्या ड्रेनेज लाईन या नवीन ड्रेनेज लाईनला जोडण्याचे काम सुरू असून ३० मे पूर्वी सर्व ड्रेनेज लाईन व कलव्हर्ट साफसफाईचे काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

**कासारवडवली उड्डाणपुलाचे काम ५ जूनपर्यत पूर्ण करण्याचे निर्देश**

कासारवडवली येथील उड्डाणपूल सुरू झाल्यानंतर घोडबंदर रोडवरील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. या पुलाची पाहणी देखील आयुक्तांनी यावेळी केली. सद्यस्थितीत या पुलाचे काम जवळ जवळ पूर्ण झाले असून उर्वरित कामे ५ जूनपर्यत पूर्ण करण्याचे निर्देश एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना यावेळी देण्यात आले.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी आनंद परांजपे तर, ठाणे जिल्हाध्यक्षपदी नजीब मुल्ला यांची नियुक्ती

**ठाणे**:-आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा तसेच प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी पक्ष संघटना बांधणीच्या दृष्टीकोनातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी आनंद परांजपे यांच्यावर जबाबदारी सोपविली आहे. तसेच ठाण्यातही राष्ट्रवादीचा वरचष्मा कायम राहावा यासाठी ठाणे गडाची सुभेदारी नजीब मुल्ला यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सक्षम नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची वाटचाल जोमाने सुरु आहे. ठाण्यातही राष्ट्रवादीचा वरचष्मा कायम राहावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने युवकांना संधी देण्याचे धोरण ठरवले आहे. त्यानुसार राष्ट्रवादीच्या ठाणे शहर जिल्हाध्यक्ष पदी तरुण तडफदार युवा नेतृत्व नजीब मुल्ला यांची नियुक्ती केली आहे. नजीब मुल्ला यांच्यावर प्रदेश सरचिटणीस तथा निरीक्षक अल्पसंख्यांक विभाग, महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका या पदांची देखिल जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नुतन जिल्हाध्यक्ष नजीब मुल्ला आणि प्रदेश सरचिटणीस आनंद परांजपे यांच्यावर सर्व स्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या नियुक्त्या जाहीर

**ठाणे** - पक्षवाढीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या आदेशानुसार ठाणे शहरातील विविध सेलच्या नियुक्त्या जिल्हाध्यक्ष सुहास देसाई आणि कार्याध्यक्ष प्रकाश पाटील यांनी नुकत्याच जाहीर केल्या. सर्व नवनियुक्त सेलच्या अध्यक्षांना देसाई आणि पाटील यांनी नियुक्तीपत्र प्रदान केले. दरम्यान, पक्षवाढीसाठी ठाणे शहरात सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार असल्याचे सुहास देसाई यांनी सांगितले.

विधीमंडळ गटनेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार चे राष्ट्रीय सरचिटणीस आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या आदेशावरून आणि मार्गदर्शनाखाली तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई आणि ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली व्यापारी सेल ठाणे जिल्हा अध्यक्षपदी संजीव दत्ता, हॉकर्स सेल ठाणे जिल्हा अध्यक्षपदी विक्रम सिंह, हॉकर्स सेल ठाणे जिल्हा कार्याध्यक्षपदी मनीषा म्हात्रे, सोशल मीडिया सेल ठाणे अध्यक्षपदी आशिष शर्मा, डॉक्टर सेल ठाणे जिअध्यक्षपदी डॉ. सुभाष यादव, ज्येष्ठ नागरिक सेल ठाणे अध्यक्षपदी दिलीप नाईक, ज्येष्ठ सेल ठाणे जिल्हा कार्याध्यक्षपदी दिलीप लोखंडे, असंघटित कामगार सेल ठाणे अध्यक्षपदी राजू यशवंत चापले, असंघटित कामगार सेल ठाणे जिल्हा कार्याध्यक्षपदी सुनील गुरव, सहकार सेल अध्यक्षपदी नारायण उतेकर, लीगल सेल ठाणे अध्यक्षपदी विनोद उतेकर, सिख समाज सेल अध्यक्षपदी जगत सिंग परोचे, वाल्मिक समाज सेल अध्यक्षपदी हरिवंश चौहान, वाल्मीक समाज सेल ठाणे जिल्हा कार्याध्यक्षपदी हरीओम चौटेला, ग्रंथालय सेल अध्यक्षपदी वर्षा साबळे यांची नियुक्ती करण्यात आली .त्यांना पद नियुक्ती पत्र सुहास देसाई आणि प्रकाश पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

दरम्यान, डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनानुसार ठाणे शहरात राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष पूर्ण ताकदीने ठाणे महानगर पालिकेची निवडणूक लढविणार आहे. ठाणेकरांमध्ये सत्ताधारी वर्गाविरोधात असंतोष आहे. ठाणेकरांना आपण सक्षम पर्याय देणार असून त्यासाठी जनमानसांत फिरणार आहोत. शिवाय, सक्रीय कार्यकर्त्यांची फळी उभी केली जाणार आहे, असे सुहास देसाई यांनी सांगितले.